


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

**प्रतिनिधी नेमणे आहे.**


बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २ जानेवारी २०२५ | अंक२४ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## तीन प्रकारची बँक खाती होणार बंद




नवी दिल्ली (वृत्तसंस्था): भारतीय रिझर्व्ह बँकेनं २०२५ च्या पहिल्या दिवसापासून म्हणजेच १ जानेवारीपासून बँकिंगच्या काही नियमांमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा परिणाम कोट्यवधी नागरिकांवर पडू शकतो. रिझर्व्ह बँकेचा हा नियम बँक खात्यांवर लागू होणार आहे. कोणत्या प्रकारची बँक खाती बंद होणार आहेत, हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. आरबीआयनं फसवणुकीची प्रकरणं रोखण्यासाठी, बँकिंग क्षेत्रातील पारदर्शकता आणि डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी सायबर गुन्हेगारीचा धोका कमी करण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. गेल्या १२ महिन्यांपासून ज्या बँक खात्यांमध्ये कसलाच व्यवहार झालेला नाही, ती खाती बंद करण्याचा आरबीआयनं निर्णय घेतला आहे. आरबीआयच्या या निर्णयामुळं जी खाती १२ महिन्यांपेक्षा अधिक काळ बंद असतील ती बंद होतील इनॲक्टिव्ह खाती ज्या बँक खात्यांमध्ये गेल्या १२ महिन्यांपासून किंवा अधिक काळापासून कोणताही व्यवहार झालेला नाही त्यांना इनॲक्टिव्ह कॅटेगरीत टाकलं जाईल. एखाद्या खातेधारकानं एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ कोणताही व्यवहार केला नसेल तर ते खातं इनॲक्टिव्ह कॅटेगरीत टाकलं जाईल. तुम्ही आवश्यकता असल्यास बँकेशी संपर्क करु ॲक्टिव्ह करु शकता. फसवणकीच्या प्रकरणांपासून वाचण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला

# फरारी आरोपींना अटक करा, मस्साजोगकर पाण्यात उतरले

**केज/मस्साजोग (रिपोर्टर): मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याबरोबर नाकाबंदी केली असती तर आरोपी फरारच झाले नसते, असा संतप्त सवाल जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांना विचारत किती दिवसात आरोपींना अटक कराल, हे आधी सांगा, नंतर बाहेर येऊ. असं म्हणत जलसमाधी आंदोलन करणाऱ्या मस्साजोग येथील गावकऱ्यांनी गावच्या पाझर तलावाच्या पाण्यात तब्बल अडीच तास आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान एका आंदोलक महिलेची प्रकृती खालावली. तिला बाजेवरून तात्काळ पाण्यातून बाहेर काढण्यात आले. नवनीत कॉवत यांच्या आश्वासनानंतर आंदोलकांनी आपले आंदोलन मागे घेतले.** मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात एकूण सात आरोपी आहेत. त्यापैकी चार आरोपी पोलिसांनी अटक केले आहेत. अन्य तीन आरोपी अद्यापही फरार आहेत. घटना घडून बावीस ते तेवीस दिवस उलटून गेल्यानंतरही बीड पोलिसांना खून प्रकरणातील तीन फरार आरोपी अटक करता आले नाहीत. यामुळे संतापलेल्या मस्साजोगकरांनी आज जलसमाधी आंदोलन करण्यासाठी



गावच्या नजीक असलेल्या पाझर तलावाच्या पाण्यामध्ये उतरण्याचा निर्णय घेतला. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास शेकडो महिला-पुरुष पाण्यामध्ये उतरले. घटनेचे गांभीर्य आणि आंदोलकांचा संताप पाहता घटनास्थळी सुरुवातीपासून जिल्हा पोलीस उपअधिक्षक मीणा, तहसीलदार हे तळ ठोकून होते. गावकऱ्यांनी फरारी तिन्ही आरोपींना अटक करा, अशी मागणी लावून धरत आंदोलन सुरू केले. सरशेवटी जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी मस्साजोग गाठले. उपस्थित गावकऱ्यांसोबत चर्चा करत पाण्यातून बाहेर येण्याबाबत विनंती केली. मात्र संतापलेल्या गावकऱ्यांनी कॉवत यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. घटना घडली त्याचवेळी नाकाबंदी केली असती तर आरोपी फरार झाले नसते, असे म्हणत किती दिवसात आरोपींना पकडणार हे आधी सांगा, तेव्हाच आम्ही पाण्याबाहेर येऊ, अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली. यावर अत्यंत शांतपणे संतप्त आंदोलकांच्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर जिल्हा पोलीस अधिक्षक कॉवत यांनी दिलं. आंदोलकांनी दहा दिवसाच्या आत आरोपींना अटक करा, असं म्हणत कॉवत यांच्या शब्दाला मान देत आंदोलकांनी आंदोलन मागे घेतले. या वेळी माध्यमाशी बोलताना कॉवत म्हणाले, आंदोलकांनी दहा दिवसात आरोपी अटक करण्याची मागणी केली आहे. माझी टीम आरोपींच्या मागावर आहे. दहा दिवसांपेक्षा दोन दिवसातही आरोपी अटक होऊ शकतात. या प्रकरणी काळजीपुर्वक तपास सुरू असल्याचे कॉवत यांनी म्हटले. या आंदोलना दरम्यान प्रभावती भीमराव सोळंके (वय ४५ वर्षे) या महिलेची प्रकृती खालावल्याने तिला तात्काळ रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले

## कल्याणी जागडे यांची परीचारिका पदी निवड

## आई-वडिलांचे कष्टाचे केल सोन



पाटोदा प्रतिनिधी :- पाटोदा तालुक्यातील पिठठी या गावची कल्याणी बंडू जागडे हीची उपकेंद्र थेरला नायगाव या ठिकाणी सहाय्यक परिचारिका पदी नियुक्ती झालयाबद्दल गावातील व पंचक्रोशी लोकांनी व नातेवाईकांनी केले तिचे अभिनंदन....

## लाचखोर मुख्याध्यापक सुर्वे विरोधात गुन्हा दाखल

केज वैद्यकीय रजेवर कर्तव्यात रुजू करून घेण्याच्या अर्जावर गटशिक्षण अधिकाऱ्याची सही घेण्यासाठी दोन हजार रुपये लाचेची मागणी करणाऱ्या मुख्याध्यापकाविरोधात लाचलूचपत विभागाने गुन्हा दाखल केला. सदरील हा मुख्याध्यापक केज तालुक्यातील विडा येथील आहे. सहशिक्षक सचीन नन्नवरे हे वैद्यकीय रजेवर होते. त्यांची रजा संपल्यानंतर कर्तव्यावर रुजू करून घेण्यासाठी त्यांनी विडा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक सुर्वे यांच्याकडे अर्ज केला होता. या अर्जावर गटशिक्षण अधिकाऱ्याची सही घेण्यासाठी मुख्याध्यापक सुर्वे यांनी सहशिक्षक नन्नवरे यांच्याकडे पैशाची मागणी केली. दोन हजार रुपये देण्याचे ठरले होते. याबाबत नन्नवरे यांनी लाचलूचपत विभागाकडे तक्रार दाखल केली होती. लाचलूचपत विभागाने सापळा रचला होता. सुर्वे यानी २ हजार रुपये घेण्याचा प्रयत्न केला होता. तसे सिद्ध झाले. त्यामुळे सुर्वे यांच्या विरोधात केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदरील ही कारवाईपोलीस निरीक्षक लाचलूचपत विभाग यांनी केली असून या प्रकरणाचा अधिक तपास शेख युनूस हे करत आहेत.

## चार वर्षापासून मतारीख पे तारीख चा खेळ सुरुच

मुंबई,- महाराष्ट्राच्या राजकीय साठमारीत गेल्या चार तारीख पे तारीख झाल्याने जिल्हा परिषदा आणि मनपांच्या निवडणुका रखडल्या आहेत. गेल्या चार वर्षांपासून फक्त तारीख पे तारीख झाल्याने सुप्रीम कोर्टात अजूनही तोडगा निघालेला नाही. अशा स्थितीत आता पुढील सुनावणीची तारीख सर्वोच्च न्यायालयात २२ जानेवारीला असून निवडणुकीबाबत सुनावणी होणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर निवडणुकांचे भविष्य असणार आहे. यावर्षी निकाल लागण्यासाठी सरकार शर्थीचे प्रयत्न करणार आहे. राज्यातील २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या ससर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०२० पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीची तयारी तर तीन वेळा करण्यात आली.

## केव्हीके खामगाव येथे 3 जानेवारी रोजी महिला शेतकरी मेळाव्याचे आयोजन

बीड दि. १ :- खामगाव ता गेवराई येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र येथे शुक्रवारी दिनांक ०३ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, कृषि विज्ञान केंद्र खामगाव, कृषी विभाग, आत्मा बीड, महिला आर्थिक विकास महामंडळ , उमेद, इफको व धान फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय भव्य महिला शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनामकृवी परभणीचे मा. कुलगुरू प्रा (डॉ) इन्द्र मणि हे असणार आहेत, तर सदर मेळाव्याचे उद्घाटन अविनाश पाठक (भा.प्र.से) जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आदित्य जीवने (भाप्रसे) मुख्य कार्यकारी अधिकारी जि प बीड , डॉ. आदिती सारडा कार्यकारी परिषद सदस्य, वनामकृवी परभणी, डॉ. गिरधारी वाघमारे, संचालक विस्तार शिक्षण वनामकृवी, परभणी आणि डॉ. तुकाराम मोटे विभागीय कृषि सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर हे असणार आहेत तर संगीतादेवी पाटील, प्रकल्प संचालक, डॉ.जया बंगाळे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य व श सयप्पा गरंडे कृषि विकास अधिकारी बीड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सौ सिताबाई मोहिते जिजामाता कृषि भूषण पुरस्कार प्राप्त, रामनगर, जालना व डॉ नीता गायकवाड, केंद्र समन्वयक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ, अ.भा. स. सं.प्र कृषीरत महिला , वनामकृवी परभणीचे मार्गदर्शन होणार आहे. तरी या मेळाव्याचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन विस्तार शिक्षण संचालनालय,कृषि विभाग, आत्मा, महिला आर्थीक विकास महामंडळ, उमेद, धान फौंडेशन, इफको, बीड व केव्हीके खामगाव यांनी केले आहे.

# सीआयडीला जमत नसेल तर शिवाजी साटम यांच्याकडे तपास द्या, अंजली दमानिया यांचा टोला



## एकाच जातीचे अधिकारी

मी बीडच्या कार्यलयांचा अभ्यास केला, त्यात झाडून वंजारी समाजाचे अधिकारी आहेत. गोपीनाथ मुंडे मुख्यमंत्री असताना त्यांना हळूहळू भर्ती करण्यात आलं आणि नंतर बीडकडे आणण्यात आलं आहे. बीडचे अधिकारी मर्जीतले आहेत, समाजाचे आहेत ते दुस-यांना काय न्याय देणार? निवडणुकीच्या काळात आमच्या बोटांना शाई लावण्यात आली आणि हाकलून दिलं. मत देऊ दिलं नाह असं अंजली दमानिया म्हणाल्या.

## वाल्मिक कराडच्या अटकेवर दमानिया काय म्हणाल्या?

वाल्मिक कराडसोबत १५ तारखेपर्यंत बॉडीगार्ड सोबत होते. हे बॉडीगार्ड आले कुठून, पेड किंवा, जिवीताला धोका असेल तर हे बॉडीगार्ड पेड होते की कमीटीने दिलेले? त्यांच्या जीवीताला धोका आहे म्हणून देण्यात आलेले बॉडीगार्ड होते?गुन्हेगारांना अटक व्हायला पाहिजे होती, १५ तारखेला बॉडीगार्डला माघारी बोलवण्यात येतं. मागच्या एसपींनी मागे घेण्याचे ऑर्डर दिले, फोनवरून या बॉडीगार्ड्सला बोलवण्यात आलं आणि फरार आहे म्हणून सांगण्यात आलंङ्क, अशी भूमिका अंजली दमानिया यांनी मांडली.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या सीआयडी चौकशीवरुन उपरोधिक टोला लगावला आहे. त्यांनी आरोपी वाल्मिक कराड याच्या अटकेच्या घडामोडींवर भाष्य करताना संबंधित टोला लगावला. ङ्क९-३१ तारखेपर्यंत जे चाललं आहे ती धुळफेक आहे. पोलीस यंत्रणा शोधत नाही, सीआयडीला जमत नसेल तर शिवाजी साटम यांच्याकडे चौकशी द्यावी असा उपरोधिक टोला अंजली दमानिया यांनी लगावला.हसण्यासारखी गोष्ट आहेङ्क, असंही अंजली दमानिया म्हणाल्या. ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांची सीआयडी मालिका ही प्रचंड लोकप्रिय आहे. या मालिकेत शिवाजी साटम हे सीआयडीचे प्रमुख आहेत. बीड प्रकरणाचा तपासावर सीआयडीकडून सुरु असलेल्या तपासावर भाष्य करताना हा तपास शिवाजी साटम यांच्याचकडे द्या, असा उपरोधिक टोला अंजली दमानिया यांनी लगावला आहे.जो व्यक्ती होता ज्याला अटक होणं गरजेचं होतं ते म्हणजे वाल्मिक कराड होते. धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यायला बरेच जण मुख्यमंत्र्यांकडे गेले. त्यावर निर्णय होण्याची शक्यता आहे. वाल्मिक कराडची अटक झाल्यानंतर मी परत आले. महाजेनकोची माहिती घेतली, जो अफाट पैसा घेतला जातोय त्याचा अभ्यास केला असं अंजली दमानिया म्हणाल्या. माध्यमांना कळतं, पण पोलिसांना कळत नाही माध्यमांना कळतं. मात्र पोलिसांना कळत नाही की तो शरण येणार आहे. महाजनकोचा प्लांड मी अभ्यासला, फ्या ऐश काय, बॉटम ॲश काय याचा अभ्यास केला. ८०% फ्लाय ऐश सीमेंट कंपनीकडे जातो, मात्र जे बॉटम ॲश आहे ती धमक्या देत, पिस्तुली दाखवून उचलल्या जात. आधीचे एसपी होते ज्यांची बदली करण्यात आली त्यांची फक्त बदली नाही तर त्यांना कामातून काढलं पाहिजे. महाजनकोमधून एसपींना अनेक पत्र गेली होती असा दावा अंजली दमानिया यांनी केला.

## संपादकीय

# प्री-डायबिटीस

मुंबई : मधुमेह हा आजार एक जागतिक आव्हान ठरले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये मधुमेहाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. मधुमेह असणाऱ्या लोकांनी आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. मधुमेह होण्यापूर्वी शरीर सूचना देते की, भविष्यात तुम्हाला मधुमेह होऊ शकतो, त्याला पूर्व-मधुमेह किंवा प्रीडायबिटीस, असे म्हणतात. प्री-डायबिटिस ही एक स्टेज आहे, जी मधुमेहाविषयी सतर्क राहण्यास सांगते. तसेच, टाईप-२ मधुमेहाचा धोका रोखण्यास आणि आपल्या जीवनशैलीमध्ये महत्त्वाचे बदल करण्याची संधी आपल्याला देते. प्री-डायबिटीसची समस् अनेकदा आनुवंशिक घटक आणि तुमची जीवनशैली कशी आहे, यावर अवलंबून असते. या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी निरोगी जीवनशैली स्वीकारून, हृदयाशी संबंधित आजाराचा धोका कमी करता येतो. आहार, व्यायाम, वजन नियंत्रण व नियमित काळजी घेतल्यामुळे आपण सुदृढ जीवन जगू शकतो. मुंबईच्या कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल येथील अँडोक्रायनोलॉजीचे प्रमुख डॉ. धीरज कपूर आणि क्लिनिकल न्युट्रिशनिस्ट कनिक्का मल्होत्रा यांच्या हवाल्याने प्री-डायबिटीसवर कसे नियंत्रण मिळवावे, याविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली. १. निरोगी आहाराला महत्त्व द्या :- प्री-डायबिटीसवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रक्रिया न केलेल्या पदार्थांचे सेवन करावे आणि पोषक समृद्ध आहार घ्यावा, असा सल्ला क्लिनिकल न्युट्रिशनिस्ट या नात्याने कनिक्का मल्होत्रा यांनी दिला. आहारात काय घ्यावे? फळे, भाज्या, धान्य, प्रोटीन्स आणि चांगल्या फॅट्सचा आहारात समावेश करावा आहारात काय घेऊ नये? साखरयुक्त स्नॅक्स, गोड पेये, जंक फूड आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचा आहारात समावेश करू नये. संतुलित पौष्टिक आहार रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतो आणि स्वादुपिंडावरील ताण कमी करतो. २. शरीराची हालचाल करा :- इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारण्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी शारीरिक हालचाल फायदेशीर ठरते. डॉ. कपूर सांगतात, वेगाने चालणे, पोहणे किंवा सायकल चालवणे यांसारखे व्यायाम आठवडाभरात १५० ते १८० मिनिटे करा. स्नायूचे आरोग्य चांगले राहावे म्हणून स्ट्रेंथ ट्रेनिंग करा. व्यायामामुळे इन्सुलिन रेझिस्टन्स कमी होते आणि वजन नियंत्रणात राहते. ३. वजन नियंत्रित ठेवा :- डॉ. कपूर सांगतात की, जर तुमचे वजन जास्त असेल, तर ते वजन ५-७% कमी करण्याचे ध्येय ठरवा. त्यामुळे इन्सुलिन रेझिस्टन्स सुधारू शकतो. तसेच आहारावर नियंत्रण ठेवून, रक्तातील साखरेची पातळी कमी करता येते. शारीरिक हालचाल किंवा व्यायाम अवश्य करा. ४. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवा :- मल्होत्रा सांगतात की, रक्तातील ग्लुकोजची तपासणी करा आणि नियमितपणे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवा. नियमित तपासणी केल्याने आहार, व्यायाम आणि इतर जीवनशैलीतील बदल रक्तातील साखरेच्या पातळीवर कसा परिणाम करतात याविषयी माहिती मिळते. जीवनशैली सुधारण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्या. ५. चांगली झोप घ्या आणि तणावमुक्त जीवन जगा :- दोन्ही तज्ज्ञ सांगतात की, नीट झोप न झाल्याने आणि अति तणावामुळे शरीरातील इन्सुलिन रेझिस्टन्स बिघडू शकतो. रात्री सात ते आठ तास विश्रांती घ्या. नियमित ध्यान, दीर्घ श्वास किंवा योगा करा. उपचार घेऊन किंवा पूर्व-काळजी करून मधुमेह टाळता येतो; पण त्याचबरोबर आपले एकंदरीत संपूर्ण आरोग्य सुधारण्यासही मदत होते.

# अमृतमहोत्सव युगपुरुषांचा

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

४ जानेवारी बहुजनांसाठी खूप महत्वपूर्ण आहे कारण याच दिवशी जन्मलेल्या व्यक्तिमत्वाने निचपित पडलेल्या बहुजनांना जागे केले .पराकोटीचे समाजभान, प्रचंड समाज परिवर्तनाची ओढ असणा–या महान व्यक्तिमत्वा विषयी मला लेखन करण्याची संधी भेटली हे मी माझे भाग्य समजते जेव्हा आपण महाराष्ट्राच्या इतिहासाकडे वळून पाहतो तेव्हा आपणास अनेक विचारवंत, समाज सुधारक, द्रष्टे व्यक्तिमत्व यांनी महाराष्ट्र घडवण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिल्याचे आढळून येते ज्यात महाराज शहाजीराजे भोसले ,राष्ट्रमाता जिजाऊ छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी राजे ,छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी शिंदे, ताराबाई शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींचा उल्लेख आवर्जून करावा लागतो थोर महापुरुषांचा समाज परिवर्तनाचा, समाज विकासाचा वारसा ख–या अर्थाने पुढे घेऊन जाऊन समाजात प्रचंड ताकतीने बदल घडवून आणण्याचे कार्य आ. खेडकर साहेबांनी केले

खेडेकर साहेब म्हणतात उपदेश करण्यापेक्षा प्रत्यक्ष काम करणा–यांची संख्या वाढवल्या शिवाय आपण काहीच करू शकत नाही. समाजातील प्रत्येक क्षेत्रात क्रांती केवळ युवकच करू शकतात हे समाजशास्त्रीय तत्व आहे. त्यामुळे युवकांनी पुढे येऊन समाज परिवर्तनासाठी महत्वपूर्ण योगदान दिले पाहिजे असा सल्लाही त्यांनी युवकांना दिला. मराठा सेवा संघाच्या स्थापनेमुळे जातीय, धार्मिक वाद कमी झाले आणि इतर जात समुदायातील ही वाद कमी झाले. फुले– शाहू– आंबेडकर यांचे विचार घरोघरी पोहोचले त्याचबरोबर हिंदू मुस्लिम दंगलीचे प्रमाण कमी झाले .मराठा सेवा संघाच्या प्रबोधना मुळे या गोष्टींना आळा बसला. छत्रपती शिवराय आमचे ही आहेत ही भावना इतर धर्मीयांमध्ये निर्माण झाली विशेषता मुस्लिम धर्मामध्ये प्रामुख्याने हे आपणास पाहायला मिळते. शिव –स्वराज्य स्थापनेत मुस्लिमांचे असलेले योगदान नि:संदीग्ध आहे हे मराठा आणि हिंदू बांधवांना ही कळू लागले आणि जो विनाकारण होणारा हिंदू –मुस्लिम वाद होता त्या वादाला मराठा सेवा संघाच्या प्रबोधना मुळे आळा बसला आणि समाज सत्कमकिडे वळलेला दिसून येतो. त्याचबरोबर मराठा समाजाच्या घरात नित्य– नियमित होणारी कर्मकांडे कमी झाली याचे श्रेय मराठा सेवा संघाच्या वैचारिक चळवळीला जाते कारण नित्य– नियमित होणा–या कर्मकांडा तून मोठ्या प्रमाणात वेळ, पैसा आणि श्रम वाया जात होता या सर्व गोष्टींना आळा बसला आणि वेळ आणि पैशांचा होणारा अपव्य थांबवण्यात सेवा संघाला यश प्राप्त झाले एवढेच नाही तर मराठा समाजात चिकित्सक वृत्ती वाढीस लागली आहे .वाचन संस्कृतीची मोठ्या प्रमाणात वाढ सेवा संघाच्या कृतीमुळे झाली कारण मराठा सेवा संघामध्ये एकमेकांना शुभेच्छा देताना पुस्तके भेट दिली जातात आणि या पुस्तकाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन शक्य आहे हे दाखवून देण्याचे काम खेडेकर साहेबांनी केले आणि एकमेकांना शुभेच्छा देताना पुस्तक देण्याचा प्रघात सेवा संघाने सुरू केला त्यामुळेच १२ जानेवारी जिजाऊ जन्मोत्सव दिवशी मोठ्या प्रमाणात सिंदखेडराजा येते पुस्तकांची विक्री होत असताना दिसून येते.



विज्ञानावर आधारित मानवतावादी मूल्यांची करणारा शिवधर्म स्वीकारला या धर्माचे प्रगटण १२ जानेवारी २००५ रोजी सिंदखेड राजा येथे करण्यात आले. असमानता व चातुर्वण्य व्यवस्था यापासून मुक्तीच्या विचाराने शिव धर्माचा स्वीकार खेडेकर साहेबांनी केला .शिवधर्म हे एका निर्मळ– निरामय समाज रचनेचे वास्तव रूप आहे. शिवधर्म हा अति प्राचीन असून वास्तवाचे ज्ञान आणि विज्ञानाचे भान या पायावर मानवाच्या सुंदर, समृद्ध आणि परस्परपूरक जगण्या साठीची उन्नती ही या धर्माची अनादी काळा पासूनची प्रेरणा आहे. शिव धर्म हा अत्यंत प्राचीन असल्यामुळे वंश ,वर्ण ,जात याबाबत या धर्माने आदीम कालापासून भेदाभेद केलेला नाही. मानवामध्ये निसर्गतः असणा–या नर आणि मादी या स्तरावर समान असणा–या शिव –शक्तीच्या रूपांना स्त्री आणि पुरुषाच्या स्वरूपा कडेङ्क जातङ्क म्हणून आदिम काळापासून पाहिले जाते . असा हा जात भेद शिवधर्म मराठा सेवा संघाने स्वीकारला आणि माणसाकडे माणूस म्हणून बघण्याचा दृष्टिकोन समाजामध्ये वाढलेला आढळून येतो.

मराठा सेवा संघाच्या माध्यमातून जन संघटन आणि जन – संघटनातून मन ,मेंदू ,मस्तक आणि मनगट सशक्त करून समाज परिवर्तनाचे अशक्य असे कार्य शक्य करून दाखवण्याचे धाडस खेडेकर साहेबांनी केले आणि ते कार्य आजतागायत ते अविरत करत आहेत त्याचे फलित म्हणजे आज महाराष्ट्रात विशेषता मराठा समाजात स्त्रियांना मिळालेले बरोबरीचे आणि मानाचे स्थान तसे पाहता भारतीय समाजात पुरुषसत्ताक समाजव्यवस्था आढळून येते पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते, तिच्याकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन यामुळे पारंपारिक काळापासून आज पर्यंत महाराष्ट्रातील नव्हे तर अखंड हिंदुस्तानातील स्त्रियांना बंदिस्त जीवन जगावे लागत आहे कारण भारतीय समाजात प्रचंड धार्मिकता आढळून येते परंतु जेव्हा मराठा सेवा संघाची स्थापना झाली तेव्हा मराठा सेवा संघाचा मुख्य उद्देश समाज प्रबोधन करणे होतं आणि समाज प्रबोधनाच्या माध्यमातून खेडेकर साहेबांनी त्यांचे कार्य सुरू केले मराठा सेवा संघाचे ३३ कक्ष स्थापन करून वेगवेगळ्या घटकांवर भर देऊन संबंधित घटकाच्या अनुषंगाने समाजात बदल आणि विकास घडवून आणण्याचे कार्य केले त्या ३३ कक्षा पैकी एक महत्वपूर्ण कक्ष म्हणजे जिजाऊ ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड सारख्या कक्षाच्या माध्यमातून खेडेकर साहेबांनी स्त्रियांना पुढे येण्याचे आव्हान केले त्यांनी आपल्या विचारातून,लेखणीतून, कृतीतून पडद्याआड राहणारी स्त्री पुढे आणण्याचे आणि समाज मानसिकता बदलण्याचे अतुलनीय असे कार्य केल्याचे आढळून येते. म्हणूनच आजची स्त्री वैमानिक, वैज्ञानिक, इंजिनियर, डॉक्टर ,वकील ,सामाजिक कार्यकर्ते , कलावंत, व्यावसायिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात मानाचे स्थान मिळवत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर समाजमनात स्त्रियांकडे बघण्याचा जो संकुचित दृष्टिकोण होता तो बदलून स्त्रियांकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोण मनामनात रुजवण्याचे कार्य सुद्धा साहेबांच्या कार्यातून झाल्याचे आढळून येते

अनेक थोर विचारवंतांनी महात्म्यांनी स्त्रिया समाजाचा महत्त्वपूर्ण घटक आहेत हे दाखवून दिले त्याच पावलावर पाऊल टाकत साहेबांनी ङ्गपाटील की आणि देशमुखी ङ्गत्याचबरोबर धार्मिक कर्मकांडाच्या साखळदंडात अडकलेली स्त्री मुक्त करून तिला प्रगतीसाठी मुक्तांगण निर्माण करून दिले. त्याचबरोबर धार्मिक कर्मकांडे ,चालीरीती, विधी व्रतवैकल्य यातून जे स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते ते शोषण कसे होत आहे आणि ते कसे चुकीचे आहे हे पटवून देण्याचे काम समाजाला केले ज्यामुळे आज व्रत –वैकल्या पेक्षा मेहनत आणि कष्टाला समाजात मानाचे स्थान प्राप्त झाल्याचे आढळून येते. खेडेकर साहेब म्हणतात स्त्रिया असो व पुरुष तर प्रत्येकाने आपला उदरनिर्वाह आणि आपल्या कुटुंबाला पुढे नेण्यासाठी आणि समाजाच्या विकासासाठी डोक्याच्या मालिश पासून बूट पॉलिश पर्यंत वेगवेगळ्या उद्योगात उतरले पाहिजे कारण आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात वाढत जाणारी बेरोजगारी ज्यामुळे निर्माण होणा–या वेगवेगळ्या समस्या आणि या समस्या तून तुम्हाला जर ख–या अर्थाने बाहेर पडायचं असेल तर या डोक्याच्या मालिश पासून बुट पॉलिश पर्यंत जे काही उद्योग समाजासाठी आवश्यक आहेत ते प्रत्येकाने करण्याचा प्रयत्न केला पाहिजे .थोडक्यात ते समाजाला आत्मनिर्भर ,स्वयंपूर्ण बनवण्यासाठी नेहमी प्रेरणा देत असतात आणि त्यांची ही प्रेरणा समाज घेत आहे आणि पुढे वाटचाल करत आहे. मराठा सेवा संघाच्या कार्यामुळे सामूहिक विवाह, वधू–वर परिचय मेळावे यासारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वेळ आणि पैशांची बचत झाली .त्याचबरोबर स्त्रियांना मोठ्या प्रमाणात ज्या समस्यांना सामोरे जावे लागत होते जसे की, हुंडा प्रथा ,विधवा पुनर्विवाह सारखे प्रश्न प्रामुख्याने समाजात मोठ्या प्रमाणात आ– वासून उभे होते त्या सर्व प्रश्नांना सडेतोड उत्तर देण्याचे काम खेडकर साहेबांच्या कार्यातून झाले ज्यामुळे मराठा समाजातील युवक आज हुंडा न घेता लग्न करत आहेत त्याचबरोबर विधवा पुनर्विवाह हा पुरुषांप्रमाणे स्त्रियांचा ही मूलभूत हक्क आहे हे लक्षात येत आहे .ज्यामुळे आज अनेक चुकीच्या प्रथा परंपरांना पाय– बंध बसलेला आढळून येतो .अशा या महान व्यक्तिमत्त्वाचा अमृतमहोत्सव जन्मदिवस त्यांना समाज विकासासाठी असेच उदंड आयुष्य लाभो ही जिजाऊ चरणी प्रार्थना!

**डॉ. सत्यभामा जाधव**
**जिजाऊ ब्रिगेड नांदेड**
**मो.नं.९४०३७४४७१५**

# महाराष्ट्राचे पहिले एआय धोरण तयार करा
## - माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांचे निर्देश

मुंबई, दि. 31 - आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने दिशादर्शक व्हावे, यासाठी राज्याचे पहिले एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण तयार करा, असे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी विभागाला दिले. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उद्योग, व्यवसाय उभे राहतील. तरुणांना रोजगार मिळेल व तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्र सक्षमपणे स्पर्धा करू शकेल, असे त्यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृहावर माहिती तंत्रज्ञान विभागाचा मंत्री ॲड.शेलार यांनी आढावा घेतला. या बैठकीस आयटी



विभागाचे सचिव पराग जैन नैनुटिया, महाआयटीच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विभागाचा आढावा घेत अधिकाऱ्यांना पुढील वाटचालीविषयी मार्गदर्शन करताना मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, एआय तंत्रज्ञानाचे युग सुरू झाले आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. एआयचा प्रभावी उपयोग करून आपण अधिक उद्योग व व्यवसाय आकर्षित करीत तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतो. जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राचे स्थान भक्कम करण्याची ही संधी आहे. मार्च 2024 मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'इंडिया एआय मिशन' अंतर्गत देशभरात एआय क्षमता वाढवण्यासाठी ₹10,372 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यात इंडिया एआय डेटासेट्स प्लॅटफॉर्म, ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट प्रकल्प, ग्राफिक प्रोसेसिंग युनिट्स, इंडिया एआय इनोव्हेशन सेंटर, फ्युचर स्किल्स प्रोग्राम आणि एआय क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी वित्तपुरवठा यांचा समावेश आहे. केंद्र सरकार जानेवारी 2025 पासून वैयक्तिक नसलेल्या डेटासेट्सचे संकलन सुरू करणार आहे. यामुळे स्टार्टअप्स, कंपन्या, शैक्षणिक संस्था आणि संशोधन ॲप्स विकसित करण्यासाठी, विविध भाषांची सेवा देण्यासाठी तसेच विशेष सेवा देण्यासाठी उपयोग होणार आहे. आपला देश तंत्रज्ञानाच्या आघाडीवर प्रगती करत असताना महाराष्ट्र यात अग्रेसर राहिला पाहिजे, असेही मंत्री ॲड.शेलार यावेळी म्हणाले. 000

# नववर्षारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडचिरोलीत

- ताराक्कासह ११ जहाल नक्षलवादी शरण
- ७७ वर्षांत प्रथमच अहेरी–गर्देवाडा बस सुरु
- लॉईडच्या विविध उपक्रमांचा शुभारंभ, ६२०० कोटींची गुंतवणूक, ९००० रोजगार
- कामगार आणि पूर्वाश्रमीच्या नक्षलवाद्यांना कंपनीचे १००० कोटींचे शेअर्स प्रदान
- गडचिरोलीपासून २०० कि.मी. दूर पेनगुंडा येथे जवान, ग्रामस्थांशी संवाद
- सी–६० जवानांचाही केला सत्कार

गडचिरोली, १ जानेवारी नवीन वर्षाचा पहिला दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गडचिरोली जिल्ह्यात व्यतित केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा अशी बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला आणि त्या बसमधून प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६२०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होते आहे. आज सकाळी गडचिरोली जिल्ह्यात आगमन झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट ताडगुडा ब्रीज येथे गेले. गट्टा–गर्देवाडा–वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे त्यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे त्यांनी जवानांशी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. हा परिसर अतिदुर्गम मानला जातो. थेट मुख्यमंत्र्यांनी त्याठिकाणी जात एक वेगळा संदेश दिला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री आहेत. त्यानंतर दुपारी कोनसरी येथे, लॉईड्सच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यात कोनसरी येथे डीआयआय प्लांट (४०० कोटी रुपये गुंतवणूक, ७०० रोजगार), पेलेट प्लांट आणि स्लरी पाईपलाईन (३००० कोटी रुपये गुंतवणूक, १००० रोजगार), हेडरी, एटापल्ली येथे आयर्न ओअर ग्राईडिंग प्लांट (२७०० कोटी रुपये गुंतवणूक, १५०० रोजगार), वन्या गारमेंट युनिट (२० कोटी रुपये गुंतवणूक, ६०० रोजगार) याचा समावेश आहे. शिवाय लॉईडस काली अम्मल हॉस्पीटल आणि लॉईडस राज विद्यानिकेतन सीबीएसई शाळेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. सुमारे १२०० विद्यार्थ्यांना येथे शिक्षण मिळणार आहे. पोलिसांसाठी निवासस्थाने, जिमखाना, बालोद्यान इत्यादींचेही लोकार्पण करण्यात आले. कामगार आणि पूर्वाश्रमीच्या नक्षलवाद्यांना कंपनीचे १००० कोटींचे शेअर्स प्रदान करुन एकप्रकारे मालकी देण्याचाही स्तुत्य उपक्रम लॉईड्सने हाती घेतला. हे शेअर्स मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. गडचिरोलीत ग्रीन माईनिंगचाही शुभारंभ करण्यात आला. यातून खाणींचे संरक्षण होणार असून लोहखनिजासाठी स्लरी पाईपलाईनमुळे इंधनबचत होणार, कार्बन उत्सर्जन कमी होणार, रस्त्यावरील अपघातही कमी होणार आहेत. ग्रीन माईनिंगचा प्रयोग



गडचिरोलीत प्रथमच राबविण्यात येत आहे. गोंडवाना विद्यापीठ ऑस्ट्रेलियन विद्यापीठाशी एक करार करणार असून, त्यातून मायनिंगशी संबंधित सर्व अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. यातून गडचिरोलीतील तरुणांनाच रोजगार मिळणार आहे, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. ११ जहाल नक्षलींचे समर्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ११ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यात ८ महिला आणि ३ पुरुष आहेत. यात दोन दाम्पत्य आहेत. या ११ जणांवर महाराष्ट्रात १ कोटींपेक्षा अधिकचे बक्षीस होते. छत्तीसगड सरकारने सुद्धा त्यांच्यावर बक्षिस जाहीर केले होते. यात दंडकारण्य झोनल कमिटीच्या प्रमुख आणि भूपतीची पत्नी ताराक्का आहेत. ३४ वर्षांपासून त्या नक्षली चळवळीत आहेत. ३ डिव्हिजन किमिटी मेंबर तर १ उपकमांडर, २ एरिया कमिटी मेंबर आहेत. या सर्वांना पुढचे जीवन जगण्यासाठी ८६ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली. निवडणूक आचारसंहितेच्या काळात ५ नक्षली ठार झाले. २०२४ या वर्षांत २४ नक्षली ठार झाले आणि १८ माओवाद्यांना अटक करण्यात आली. गेल्या ६ महिन्यात १६ जहाल नक्षलवादी आणि आज ११ असे २७ जण मुख्य प्रवाहात आले आहेत. उत्तर गडचिरोली माओवादापासून मुक्त झाली, लवकरच दक्षिण गडचिरोली सुद्धा होईल. गेल्या ४ वर्षांत एकही युवक किंवा युवती माओवादात सहभागी झाली नाही, ही फार मोठी उपलब्धी आहे. ११ गावांनी नक्षलवाद्यांना बंदी केली आहे. सी–६० च्या जवानांनी जनतेचा विश्वास संपादन केला. आता संविधानविरोधी चळवळीत कुणीही जायला तयार नाही, ही आनंदाची बाब आहे. न्याय मिळायचा असेल तर भारतीय संविधानानेच मिळू शकतो, तो माओवादी विचारसरणीने मिळू शकत नाही, हे जनतेला आता पटले आहे. येत्या काळात गडचिरोलीला पोलाद सिटीचा दर्जा मिळणार, असे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची अतिशय मोलाची मदत या अभियानात मिळते आहे. आता माओवादाविरोधात लढाईत राज्यांच्या सीमा उरलेल्या नाहीत. महाराष्ट्राने सुद्धा सीमेबाहेर जाऊन कारवाया केल्या आहेत. शरणागती पत्करलेल्या नक्षल्यांचे संपूर्ण पुनर्वसन करण्यात येईल, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com


# जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करा

मुख्यमंत्र्यांचे अधिका–यांना आदेश

मुंबई : जात पडताळणीप्रमाणपत्र काढण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. या प्रमाणपत्रासाठी सर्वसाम ान्यांना अनेकदा शासकीय कार्यालयांची पायरी चढावी लागते. शहरी भागात राहणा–या नागरिकांना आपल्या गावी जावून पाठपुरावा करावा लागतो. अनेकदा याबाबतच्या कामांना अडचणी येत असल्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे नागरिकांना देखील मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.ऑफलाईन कामे करत असताना, काही वेळेला काही शासकीय कर्मचारी किंवा अधिका–यांनी दुर्लक्ष केलं तर आपली फाईल तशीच जागेवर पडून राहते. पण ऑनलाईन अर्ज केला आणि किती दिवस आपलं काम झालं नाही ते ऑनलाईन समजतं. ऑनलाईन असल्यामुळे सगळ्या गोष्टी पारदर्शकपणे समजतात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करा, असे आदेश दिल्याने त्याचा सकारात्मक परिणाम पडलेला बघायला मिळू शकतो.शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमुळे राज्यातील पात्र निराधारांना दिलासा मिळतो. मात्र निराधारांना लाभ मिळण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेच्या अर्थसाहाय्याचे वितरण हे थेट लाभ हस्तांतरण पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच जात पडताळणी प्रक्रिया आणि विद्यार्थी वसतीगृह प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करण्याचे निर्देश देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.सह्याद्री अतिथीगृह येथे सामाजिक न्याय विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला

## १०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गतफ विशेष मोहिमेचे आयोजन जाती दावा त्रुटी पडताळणीसाठी प्रस्ताव सादर करावे

बीड दि. १ :– शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये व्यवसायिक अभ्यासक्रम ास प्रवेशित विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्र अभावी गैरसोय होऊ नये, कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड मार्फत १०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गतफ विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेसाठी व तयार असलेले जात वैधता प्रम ाणपत्र समिती स्तरावरून निर्गमित करण्यासाठी विशेष मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे सन २०२४–२५ मध्ये इयत्ता ११ वी १२ विज्ञान व व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी बीड समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी होऊन जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे अर्ज दाखल केलेले आहेत. अशा सर्व जाती दावा प्रकरणांमध्ये समिती स्तरावर प्राथमिक छाननी करून ज्या प्रकरणांमध्ये कागदपत्रे पुराव्या अभावी त्रृटी आढळून आलेली आहे, अशा प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या जाती दावा प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा लेखी पत्रान्वये त्रुटी असल्याचे कळविण्यात आलेले असून शैक्षणिक, सेवा, निवडणूक व इतर कारणासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव कार्यालयात प्रलंबित आहेत. अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जम ाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनीयमन) अधिनियम २००० मधील कलम ८ अन्वये जाती दावा सिद्ध करण्याची जबाबदारी अर्जदार यांची असल्याने जाती दावा पडताळणी कामे तात्काळ समितीकडे आपल्या प्रकरणातील त्रुटी पूर्तता करण्यात यावी, जेणेकरून सन २०२४–२५ यापुढील शैक्षणिक वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यावसायिक पाठ्यक्रमाकरिता राखीव प्रवर्गातून आरक्षित जागेवर प्रवेश घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यास प्रवेश प्रक्रिया नोंदणी अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. जात पडताळणी कार्यालयात त्रुटी पुर्ततेअभावी जाती दावा समितीकडून फेटाळण्यात आल्यास तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी, निवडणूक, सेवेसाठी आपात्र ठरल्यास याची जबाबदारी अर्जदार उमेदवारांची राहील त्यामुळे समितीच्या वतीने विशेष अभियान दरम्यान कार्यालयीन वेळेत प्रमाणपत्र पडताळणी ङ्ग१०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गतफ त्रुटी पुर्तता विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष शिबिराचा जास्तीत जास्त अर्जदारांनी लाभ घ्यावा व सन २०२४–२५या शैक्षणिक वर्षांमध्ये इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान शाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे अर्ज दाखल करावेत, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# बीड सरपंच हत्या प्रकरणाच्या तपासासाठी सरकारकडून SIT स्थापन, मोठ्या घडामोडी

बीडच्या केज तालुक्यातील म स्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सरकारने एक महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी राज्य सरकारने एसआयटीची समिती स्थापन केली आहे. या समितीत ९ पोलीस अधिकारी आहेत. आयपीएस बसवराज तेली यांच्या नेतृत्वात एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. बसवराज तेली सीआयडीमधील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख आहेत. एसआयटीमध्ये सर्वच अधिकारी बीड जिल्ह्यातले आहेत. सध्याचे तपास अधिकारी डीवायएसपी अनिल गुजर हेही तपास पथकात असणार आहेत. एसआयटीमध्ये कोण कोण? वाचा संपूर्ण यादी १) अनिल गुजर, पोलीस उप अधीक्षक २) विजयसिंग शिवलाल जोनवाल, स. पो. निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड ३) महेश विघ्ने, पो. उ. निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड ४) आनंद शंकर शिंदे, पो. उ. निरीक्षक, केज



५) तुळशीराम जगताप, सहा. पो. उ.निरीक्षक ६) मनोज राजेंद्र वाघ, पोलीस हवालदार ७) चंद्रकांत एस. काळकुटे, पोलीस नाईक ८) बाळासाहेब देविदास अहंकारे, पोलीस नाईक ९) संतोष भगवानराव गित्ते, पोलीस शिपाई तपासाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घडामोडी संतोष देशम ुख हत्या प्रकरणाचा तपास आता आणखी वेगाने होतोय. राज्य सरकारने आरोपी वाल्मिक कराड याला पकडण्यासाठी त्याचे आर्थिकदृष्ट्या नाक आणि तोंड दाबण्याचा प्रयत्न केला. राज्य सरकारने त्याची संपत्ती जप्त केली. तसेच बँक खाते देखील गोठवले. यानंतर वाल्मिक कराड हा सीआयडीला शरण आला. विशेष म्हणजे गेल्या २२ दिवसांत वाल्मिक कराड हा मध्य प्रदेश, गोवा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये फिरला. यानंतर तो महाराष्ट्रात पुण्यात आला. तो त्याच्या समर्थकांसह पुण्यात सीआयडी कार्यालयात सरेंडर होण्यासाठी काल दाखल झाला. त्याच्या समर्थकांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या. अखेर सीआयडी तपासातून कराड हा तीन राज्ये फिरल्याची माहिती समोर आली.

# बँका, पतसंस्था, मल्टीस्टेटने बीडकरांचे आर्थिक कंबरडे मोडल्यानंतर आता

## बीडच्या पोस्टल पतसंस्थेत देखील झाला लाखोंचा घोटाळा

### ६ संचालकांनीच केली उपनिबंधकाकडे अध्यक्ष वीर, उपाध्यक्ष सांगळे, सचिव ढाका, लिपिक वैष्णव सह पोस्टमास्टर पानखडे यांच्या भ्रष्टाचाराची तक्रार

बीड / प्रतिनिधी बीड जिल्ह्यामध्ये मागील दशकापासून मध्यवर्ती बँकेसह विविध बँका, त्यानंतर पतसंस्था आणि आता मल्टीस्टेट बँकेतील भ्रष्टाचाराने बीडकरांचे आर्थिक कंबरडे अक्षरशः म ोडले आहे. बँकांनी आर्थिक विश्वासघात केल्यामुळे आत्तापर्यंत २० पेक्षा अधिक ठेवेदारांनी आत्महत्या केल्या आहेत. अनेकांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. अनेक जण वेडे होण्याच्या म ार्गावर आहेत. अशी विदारक परिस्थिती असताना आता देश स्तरावरील विश्वासू विभाग म्हणून ज्या पोस्ट विभागाकडे पाहिले जाते त्या पोस्टातील पोस्टल पतसंस्थेत पतसंस्थेचे अध्यक्ष विष्णु वीर, उपाध्यक्ष संतोष सांगळे, सचिव अमरसिंह ढाका, लिपिक एल. आय वैष्णव आणि पोस्ट मास्टर एच एस पानखडे यांनी अनियमित आणि सभासद नसलेल्या व्यक्तींना कर्ज वाटप करून लाखोचा अपहार केला असल्याबाबत लेखी तक्रार करून विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करावं आणि पतसंस्थेवर प्रशासक नेमावा अशी जिल्हा उपनिबंधक बीड यांच्याकडे पत्तसंस्थेच्याच ६ संचालकांनी तक्रार केल्याने खळबळ उडाली आहे.

बीड पोस्ट पतसंस्थेच्या सहा संचालकांनी पतसंस्थेतील अध्यक्षासह ७ सत्ताधारी संचालकांच्या भ्रष्टाचाराचे वाभाडे काढत पुराव्यानुसार बीड जिल्हा उपनिबंधकाकडे लेखी तक्रार करत बीड पोस्टल पतसंस्थेतील विद्यमान अध्यक्ष विष्णू किसन वीर, उपाध्यक्ष संतोषसांगळे, सचिव अमरसिंह ढाका, लिपिक वैष्णव एल आय आणि पोस्ट मास्टर एच एस पानखडे यांनी संगमने अनियमितपणाने कर्जवाटप करून पतसंस्थेत लाखो रुपयांचा अपहार केलेला आहे. त्यामुळे या पदाधिका–




यांवर कायदेशीर कारवाई करून प्रशासक नियुक्त करण्यात यावा आणि दंडव्याजासहित अपहाराची रक्कम वसूल करण्यात यावी अशी मागणी केली आहे. बीड जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे ज्या सहा संचालकांनी तक्रार दाखल केली आहे ती,

**प्रति, मा. जिल्हा उपनिबंधक साहेब, सहकारी संस्था. बीड. विषय :- बीड पोस्टल को-ऑप क्रेडिट सोसायटीतील अनियमित कर्ज प्रकरणाची तपासणी करणे बाबत.**

महोदय चरील विषयी निवेदन देण्यात येते की, बीड पोस्टल को–ऑप सोसायटीचे नवीन संचालक मंडळ जानेवारी २०२४ ते जानेवारी २०२९ असे निवडणुकीद्वारे निवडण्यात आलेलेआहे. आम्ही आज रोजी संस्थेचे कर्ज वाटप रजिस्टर व बैंक डिमांड नोट तपासले असता आम्हाला त्यामध्ये काही अनियमितता आढळून आली. जसे की, संस्थेचा सभासद नसलेल्या आणि भारतीय टपाल विभागामध्ये कोणत्याही पदावर कार्यरत नसलेल्या व्यक्तीस अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांनी संगणमताने वाघमारे सनिल सुंदर यांना सभासद क्र. १०३८ असा डिमांड मध्ये दाखवलेला आहे परंतु असा कठलाही सभासद मागिल मिटींगमध्ये चर्चेत आलेला नाही किंवा अर्ज देखील केलेला नाही परंतु त्यांना सुमारे ५.०० लक्ष कर्ज वाटप दिनांक ०६.१२.२०२४ ४ रोजी केले आहे. तसेच आमच्या असे लक्षात आले की, असाच प्रकार जुलै २०२४ मध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांनी सस्थेचा सभासद नसलेल्या व्यक्तीस संगणमताने सुमारे १०,०० लक्ष कर्ज वाटप केले आहे व में २०२४ ची डिमांड १ जुलै ला डि.सी.सी. बँकेत सादर केलेली आहे. त्यामध्ये एकूण ४ सभासदांनाच कर्ज वाटप केल्याचे डिमांड मध्ये निर्दर्शनास येते. परंतु नंतर संचालक मंडळास अंधारात ठेवून काही लोकांना अनियमितपणे कर्ज वाटप केले आहे. त्यापैकी दत्ता पंडितराव शिंदे हा सभासद किंवा कर्मचारी नसतांना चेक क्र. ०७४२७६ रुपये १०.०० लक्ष कर्ज म्हणून देण्यात आले आहे असे निर्दर्शनास आले आहे. तसाच प्रकार त्राऊड इचब कर्मचान्यांच्या बाबतीत घडलेला आहे. संस्थेच्या नियमात अछद्ध कर्मचा–्यास कर्ज मर्यादा ही ५.०० लक्ष रुपये आहे. मात्र अधिकाराचा गैरवापर करुन संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांनी सदर MCS> कर्मचा–्यास १०.०० लक्ष रुपये जुलै २०२४ मध्ये वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच संस्थेचे सर्व रजिस्टर आज रोजी आम्ही संस्थेच्या लिपीका समोर बघितले असता आम्हाला असे आढळून आले आहे की, नवीन संचालक मंडळ जानेवारी २०२४ पासून अस्तित्वात आहे. मात्र प्रोसिडींग रजिस्टरमध्ये वरील अनियमित कर्ज वाटपाची कोणत्याही प्रकारची नोंद नाही. व प्रोसिडिंग रजिस्टर नियमानुसार भरण्यात आलेले नाही. त्यामुळे आम्हाला वरील अनियमित प्रकाराचा संशय आला. तसेच आम्हास असा संशय आहे की, जानेवारी २०२४ पासून वाटप केलेली कर्ज वसूली अनियमित आहे. त्याबद्दल अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेत नाहीत व कर्ज डिफॉल्टर यादी संस्थेच्या मासिक मि टींगमध्ये संचालक मंडळासमोर मांडत नाहीत, त्यामुळे विरोधी गटाचे खालील सहा संचालक आपणास विनंती करत आहोत की, बीडपोस्टल को–ऑप क्रेडिट सोसायटीची त्वरीत दप्तर तपासणी करावी व अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांचे सर्व अधिकार काढून त्यांचे संचालक पद रद्द करावे. व संस्थेवर तात्पुरत्या स्वरुपात प्रशासक नेमावा. जेणे करुन इतर सभासदांचे भविष्यातील नुकसान टळेल व त्यांचे भागभांडवल सुरक्षित राहील, जेणे करुन सभासदांना भविष्यात कर्ज घेण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही.

तरी मा. साहेबांनी तात्काळ कार्यवाही करावी हि नम्र विनंती. तसेच संबधितावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, आपले विश्वासू सर्वश्री किरण अनिरुद्ध

सावंत संचालक, नितीन भगवानराव आमटे, संचालक, धनंजय अभिम ान शेंडगे संचालक, भारतभूषण शिवाजीराव बारंगुळे संचालक, विशाल श्रीमंत घोरड– संचालक, श्रीमती अनिता आसराजी क्षिरसागर– संचालिका यांनी पोस्टल पत्तसंस्थेतील कठीण घोटाळा बाहेर काढल्याने आता पतसंस्थेच्या भाग भांडवलदार सभासदांमध्ये खळबळ उडाली आहे केंद्रीय पोस्टल विभाग वाची दखल घेऊन भ्रष्टाचारी संचालक मंडळावर कारवाई करणार आहे का?

# दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्यावर भर देणार सार्वजनिक आरोग्य विभागाचा घेतला आढावा

**मुंबई, दि. १ : रुग्णसेवा ही ईश्वरसेवा असून राज्यातील जनतेचे आरोग्य जपण्याची जबाबदारी महत्त्वपूर्ण आहे. उत्कृष्ट वैद्यकीय उपचार, औषधे आणि अनुषंगिक सेवांच्या माध्यमातून राज्यातील जनतेला दर्जे दार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत पुरविण्यात आलेल्या औषधांच्या नमुन्यांची त्रयस्थ पद्धतीने तपासणी करण्याचे निर्देशही सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आरोग्य भवन येथील सभागृहात आयोजित बैठकीत सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी विभागाचा आढावा घेतला. बैठकीला अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान सचिव नवीन सोना, वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत डांगे, आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक, राज्य आरोग्य सेवा हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन आंबाडेकर, संचालक स्वप्निल लाळे यांच्यासह आरोग्य विभागातील विविध शाखांचे अधिकारी उपस्थित होते.म हाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण अधिक सक्षम करावे सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, रुग्णालयांत चांगल्या दर्जाची व नामांकित कंपन्यांची औषधे पुरवण्यात यावी. सध्या देण्यात येत असलेल्या औषधांतील मड्रग कन्टेन्टफ तपासून घ्यावा. महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण अधिक सक्षम करावे, त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. प्राधिकरणाचे कंपन्यांशी झालेले दर करार तपासण्यात यावेत. गरीब रुग्णांना मिळणारी औषधे दर्जेदार असावी, याविषयी विशिष्ट कार्यपद्धती तयार करावी. औषध नमुन्यांच्या तपासणीमध्ये दोषी आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करावी.बॉम्बे नर्सिंग कायद्यानुसार नोंदणीकृत रुग्णालयांनी त्यांच्या तपासणीचे आणि सुविधांचे दर ठळक स्वरूपात रुग्णालयांमध्ये प्रसिद्ध करावेत. कुठल्याही प्रकारे रुग्णांची आर्थिक फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. राज्यात सुरू असलेल्या रक्त तपासणी व अन्य प्रयोगशाळांच्या सनियंत्रणासाठी कायदा करण्यासंदर्भातील प्रक्रिया त्वरीत करण्यात यावी. प्रयोगशाळांच्या तपासणीसाठी भरारी पथके तयार करावी, याबाबतीत विशिष्ट कार्यपद्धती अंमलात आणावी. मनोरुग्णालयांचे सक्षमीकरण करावेसार्वजनिक आरोग्य विभागाची काही रुग्णालये वैद्यकीय**




**शिक्षण विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात हस्तांतरित करण्यात आली आहेत. रुग्णालयांचा याबाबतचा करार संपला असल्यास ती पुन्हा विभागाकडे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. विभागाकडे अत्यंत महत्वाचा असलेला मानसिक आरोग्य कार्यक्रम प्रभावीपणे राबवावा. मानसिक रुग्णांचे वाढते प्रमाण पाहता असल्याने विभागाकडे सद्यस्थितीत असलेल्या मनोरुग्णालयांचे सक्षमीकरण करावे. यासाठी प्रशिक्षित म नुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही श्री. आबिटकर यांनी दिले. सद्यस्थितीत डायलिसिस, एमआरआय, सिटी स्कॅन तसेच अन्य रक्त चाचण्यांचे अहवाल विलंबाने मिळत असल्याच्या तक्रारी येत आहेत. यामुळे निदान उशिरा होऊन उपचार योग्य पद्धतीने मिळत नाहीत. याबाबतीत सेवा घेतलेल्या कंपनीचे करार तपासावेत. तपासणी अहवाल विलंबाने येण्याची चौकशी करावी. याविषयी समिती नियुक्त करून तातडीने चौकशी करून दोषी आढळल्यास कारवाई करावी, अशा सूचनाही श्री. आबिटकर यांनी दिल्या. रुग्णालयांच्या इमारतींचे विशिष्ट मॉडेल तयार करावे श्री. आबिटकर म्हणाले की, आरोग्य विभागाच्या रुग्णालयांच्या इमारतींचे एक विशिष्ट मॉडेल तयार करावे. इमारत सुंदर असावी, यासाठी विभागाने वास्तूविषारदांचे पॅनल तयार करावे. उत्कृष्ट दर्जाच्या इमारती असण्यासाठी आग्रह असावा. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत असलेल्या पायाभूत सुविधा, विकास शाखेचे बळकटीकरण करावे. या शाखेंतर्गत रुग्णालये, इमारती पायाभूत सुविधांची निर्मिती करावी.आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावीराज्यात शासकीय रुग्णालयांमध्ये स्वच्छता, रुग्णांना मि ळणा-या जेवणाचा दर्जा उत्तम असावा. आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी. योजनेंतर्गत असलेल्या रुग्णालयांमध्ये रुग्णाला कुठेही पैसे भरावे लागू नये, अशा तक्रारी सम ोर आल्यास संबंधितांवर कारवाई करावी. महात्मा फुले जन आरोग्य अभियानातील अंगीकृत असलेल्या रुग्णालयांचे कामकाज चुकीचे आढळल्यास चौकशी करून संबंधित रुग्णालय पॅनलवरून कमी करण्यात येईल. महिलांमध्ये सध्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्शवभूम ीवर महिलांमधील कर्करोगाचे निदान व तातडीने उपचार मिळण्यासाठी जिल्हास्तरावर तपासणी मोहीम राबवण्याचे निर्देशही श्री. आबिटकर यांनी दिले. बैठकीमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान, वैद्यकीय अधिका-यांची पद भरती, सध्या उपलब्ध असलेले म नुष्यबळ व रिक्त पदे, मानसिक आरोग्य आस्थापना, डायलिसिस व अन्यसेवांचा विस्तार, अर्थसंकल्पीय तरतुदी, माता व बाल आरोग्य तपासणी कार्यक्रम, १५ व्या वित्त आयोगाचा निधी, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम, नियमित लसीकरण, राष्ट्रीय कीटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम, सिकलसेल निर्मूलन कार्यक्रम, कर्करोग निदान कार्यक्रम, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय वृद्धापकाळ आरोग्य कार्यक्रम, अंधत्व नियंत्रण कार्यक्रम, महात्मा फुले जन आरोग्य अभियान, मोबाईल मेडिकल युनिट, महाराष्ट्र वैद्यकीय आपत्कालीन सेवा आदींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ०००००**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com


## बँकांची तब्येत ठणठणीत; सकल बुडीत कर्जे १२ वर्षांच्या नीचांकाला



मुंबई : देशाच्या बँकिंग व्यवस्थेची पत गुणवत्तेची स्थिती सुदृढ बनली असून, बँकांची सकल अनुत्पादित मालमत्ता (ग्रॉस एनपीए) अर्थात एकत्रित बुडीत कर्जांचे प्रमाण सप्टेंबर २०२४ अखेर हे २.६ टक्के असे १२ वर्षांच्या नीचांक पातळीला घसरले असल्याचे रिझर्व्ह बँकेने सोमवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालाद्वारे स्पष्ट केले. त्याचवेळी बँकांमधील कर्ज–निर्लेखनाच्या (राइट– ऑफ्स) प्रमाणातील लक्षणीय वाढीकडे अहवालाने लक्ष वेधले आहे. साचत गेलेल्या बुडीत कर्जाचे प्रमाण नीचांकी पातळीवर घसरण्यासह, नव्याने कर्ज थकत जाण्याच्या प्रमाणात घट, बरोबरीने कर्ज मागणीतही वाढ या बँकिंग व्यवस्थेतील सकारात्मक गोष्टींना अहवालाने पटलावर आणले आहे. तथापि बुडीत कर्जाच्या मात्रेला झाकले जाऊन, ते कमी करण्यासाठी कर्ज निर्लेखनासारख्या पद्धतींचा वाढलेला वापर आणि मुख्यत: खासगी बँकांमध्ये दिसून येत असलेली असुरक्षित कर्जातील वाढ आणि कर्जमंजुरी प्रक्रियेच्या मानकांबाबत हयगयीवर अहवालात बोट ठेवण्यात आले आहे.

# रेल्वे प्रशासनाने केलेल्या अतिक्रमाबाबत व रस्त्यासाठी हिवरसिंगा येथील

## शेतकरी करणार सामुदायिक आत्मदहन

**बीड,/प्रतिनिधी**

अहमदनगर बीड परळी हा रेल्वे मार्ग सध्या अंतिम टप्प्यात असून काही ठिकाणी रेल्वे प्रशासनाने केलेल्या अतिक्रमणाबाबत व पर्यायी रस्त्यासाठी हिवरसिंगा येथील शेतकरी सामुदायिक आत्मदहन करणार असल्याचे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातं म्हटले आहे.रवी शिंदे,रामेश्वर पांडुळे,अमोल भालेराव यांचे वतीने निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की आम्ही सर्व हिवरसिंगा येथील रहिवासी आहोत.अहमदनगर बीड परळी या रेल्वे मार्ग कामे आमच्या गट नंबर ६९६, ७०१,७०३,७९३ म्हणजे गट नंबर ६९६ पासून मालकाचीवाडी मुख्य रस्त्यापर्यंत सदर रेल्वे प्रकल्प कामी आमच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत. सदर रेल्वेप्रकल्प हा बीड जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. परंतु नमूद गट नंबर ६९६ पासून मालकाचिवाडी रस्त्यापर्यंत रेल्वे विभागाने संपादन जमिनीपेक्षा ज्यादा क्षेत्रावर अतिक्रमण करून भराव केलेला आहे. तसेच रेल्वे प्रशासनाने आमच्या शेतातील पिके बाहेर मुख्य रस्त्यापर्यंत काढण्यासाठी पर्याय रस्ता करून दिलेला नाही त्यामुळे आम्हा सर्व शेतकऱ्यांची पिके शेतातून बाहेर काढण्यासाठी अडचण निर्माण झालेली आहे.त्यामुळे आम्हा सर्व शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. सदर बाब हि रेल्वे प्रश्नासनाला वेळोवेळी निदर्शनास आणून दिलेली आहे. परंतु प्रशासनाने दमदाटी करून आमच्या जमिनीवर जादाचे अतिक्रमण करून रस्ता करून दिलेला नाही. सदर बाबत खालील सह्या करणारे शेतकरी श्री शाहूराव विठ्ठल शिंदे यांनी १६ ८ २०२३ रोजी उपविभागीय अधिकारी पाटोदा बीड यांना ईमेल द्वारे अर्ज पाठवलेला होता त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. ततरी गट नंबर ६९६ पासून मालकाचीवाडी ते हिवरशिंगा या मुख्य रस्त्यापर्यंत संपादन केलेले क्षेत्र वगळता जादाचे क्षेत्रवर केलेले अतिक्रमण निष्काशीत करून देण्यात यावे. तसेच गट नंबर, ६९६ पासून मलकाचीवाडी हिवरसिंगा मुख्य रस्त्यापर्यंत शेतातील पिके बाहेर काढण्यासाठी रस्ता खुला करून देण्यात यावा. तसेच संपादन केलेल्या जमिनीबाबत संपादन केलेले क्षेत्राचे निश्चिती करून बॉण्ड्री निश्चित करून देण्यात यावी. तसे न झाल्यास वेगळी कोणती सूचना न देता रेल्वे समोर सामुदायिक आत्मदहन करणार आहोत.सदर बाबत काही अनुचित प्रकार घडल्यास अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी रेल्वे प्रशासन जबाबदार राहील.असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर शाहू शिंदे, भानुदास शिंदे,मिटू शिंदे,बबन शिंदे, दादासाहेब शिंदे,रामेश्वर शिंदे, भगवान शिंदे,हनुमान शिंदे, शिवाजी सालपे,संभाजी सालपे,मारुती सालपे, अशोक शिंदे,गणेश शिंदे, यांच्यासह जवळपास तीस शेतकऱ्यांच्या सह्या आहेत. एक–दोन दिवसांमध्ये लवकरच हिवरसिंगा येथे येऊन घटनास्थळाची तहसीलदार सुरेश घोळवे पाहणी करणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले आहे.

# नववर्षाच्या प्रारंभालाच किनवट माहूर विधानसभा मतदारसंघावर दुःखाचा डोंगर

## माजी आमदार प्रदीप नाईक यांचे निधन आज दहेलीतांडा येथे होणार अंत्यसंस्कार



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड–किनवट : नववर्षाच्या प्रारंभालाच किनवट माहूर विधानसभा मतदारसंघावर दुःखाचा डोंगर कोसळला असून तब्बल पंधरा वर्षे या मतदारसंघावर अधिराज्य गाजवणारे माजी आमदार प्रदीप नाईक यांचे दि.१–जानेवारी रोजी सकाळी ५.३० मिनिटाला हृदयविकाराच्या झटक्याने हैदराबाद येथे हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना निधन झाले. ते शरदचंद्र पवार गटांचे ज्येष्ठ नेते होते. संपूर्ण महाराष्ट्र त्यांना ओळखत होता.

एवढेच नव्हे तर त्यांनी किनवट माहूर विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासात्मक कामे केली. बंजारा समाजावर त्यांचे कायमस्वरूपी प्रभुत्व होते. इतर समाजात सुद्धा त्यांच्या कार्याची छाप निर्माण झाली होती. एक मनमिळाऊ स्वभावाचे नेतृत्व किनवट माहूर मतदार संघाने नववर्षाच्या प्रारंभालाच गमावलं माजी आमदार प्रदीप नाईक यांच जाण हे किनवट माहूर विधानसभा मतदारसंघासाठी पोकळी निर्माण करून गेलं. हजारोंच्याहत्यांचा नेता अखेर पडद्याआड गेला.

राजकारण करत असताना त्यांनी कधी सूडभावनेचे राजकारण कधी केले नाही. त्यामुळे त्यांना विरोधक हि विरोध करत नसत.

मृत्यूसमयी ते ६९ वर्षाचे होते. त्याच्या पश्चात पत्नी दोन मुली जावई मुलगा कपिल नाईक सून नातवंडे असा म ोठा परिवार त्यांच्या पाठीमागे होता. दि.२–जानेवारी रोजी त्यांच्या राहत्या गावी दहेली तांडा या ठिकाणी सकाळी ११ वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### कर्तव्यनिष्ठ लोकसेवक हरपला

किनवटचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनानं धडाडीचा लोकप्रतिनिधी, कर्तव्यनिष्ठ लोकसेवक हरपला आहे. त्यांच्या निधनानं किनवटच्या सामाजिक जीवनाशी घट्ट नाळ जुळलेलं व्यक्तिमत्त्व हरपलं आहे. किनवट विधानसभा मतदार संघाच्या विकासात त्यांनी दिलेलं योगदान कायम स्मरणात राहील, दिवंगत प्रदीप नाईक यांच्या कुटुंबियांच्या. सहका–यांच्या, कार्यकर्त्यांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी असून मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.

**-अजित पवार, उपमुख्यमंत्री**

### प्रदीप नाईक माझे सच्चे मित्र होते

माजी आ. प्रदीप नाइक हे माझे राजकीय विरोधक असले तर सच्चे मित्र होते. किनवट माहूर मतदार संघात त्यांनी विकासाची दूरदृष्टी ठेवुन केलेले काम विसरता येणार नाही. प्रदीप नाईक यांच्या अकाली निधनाने मतदारसंघाची मोठी हानी झाली असून त्यांचे निधन अतिशय धक्कादायक आहे. किनवट माहूर विधानसभा क्षेत्रातील तमाम जनतेच्या वतीने मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, आशा शब्दात आ. भिमराव केराम यांनी माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाबद्दल शोक प्रतिक्रीया दिली.

**भीमराव केराम, आमदार (किनवट, माहूर)**

### नांदेड जिल्ह्याच्या विकासात नाईक यांचे योगदान

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाची दुःखद बातमी समजली, नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात नाईक यांचे योगदान फार मोठे आहे. जिल्ह्यात जलक्रांती घडवून आणत त्यांनी शेतक–यांना समृद्ध केले. प्रदीप नाईक यांच्या रूपाने एक दूरदृष्टी असलेला नेता आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. नाईक कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत, भावपूर्ण श्रद्धांजली !

**खा.शरद पवार, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

### नाईकांचे अकस्मात निधन धक्कादायक

किनवटचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाची बातमी अतिशय दुःखद आहे. विधीमंडळात आम्ही सहकारी होतो. नांदेड जिल्ह्याच्या विकासासंदर्भात आम्ही एकत्र काम केले. त्यांचे अकस्मात निधन धक्कादायक आहे. माजी आमदार प्रदीप नाईक यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे.

**अशोकराव चव्हाण, खासदार**

### कार्यकर्त्यांना न्याय देणारा हिरा गमावला

शुन्यातुन आमचे राजकीय विश्वनिर्माण करून एका उंचीवर साम ान्य कार्यकर्त्याला न्याय देणारा हिराच आम्ही गमावला, माजी आ. प्रदीप नाईक यांच्या निधनाने किनवट माहूर विधानसभा म तदार संघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या निधनाने आम्ही पोरके झालो असल्याची प्रतिक्रीया व्यक्त केली.

**प्रकाश राठोड, माजी जि. प. उपाध्यक्ष**

# संत बाळूमामांनी प्राण्यात देव पाहिला–लक्ष्मण महाराज


## तुम्हाला आम्हाला मानसातला देव कळेल का?



पाटोदा (रिपोर्टर): सोमवती आमवशा निमित्त संत बाळूमामा यांच्या स्थळावरती भव्य दिव्य असा कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी हजारोच्या संख्येने पाटोदा, चुंबळी,तांबराजुरी, धनगर जवळका, य`वलवाडी, पारनेर, शिखरवाडी तांबाराजूरी, उंबरविहीरा, बांगरवाडी, तळे पिंपळगाव, गितेवाडी, महासांगवी वाघाचावाडा, डोंगरकिन्ही सह अनेक गावातील मोठ्या संख्येने भाविकांची दर्शनासाठी व कीर्तनासाठी उपस्थिती होती.सामान्य जीवाच्या उद्धाराकरता संतांचा अवतार कार्य आहे तुम्ही संत मायबाप कृपावंत काय मी पतीत कीर्ती वानू अवतार तुम्हा धराया कारण उद्धाराया जड जीवा मानवी जीवनामध्ये आल्यावर प्रपंच करत करत परमार्थ साध्य केला पाहिजे तर या जन्ममरणाच्या फेऱ्या मधून आपली सुटका होईल अन्यथा पुन्हा जन्म आणि मृत्यूच्या राहतकार्यामध्ये मनुष्य नाम जीव भटकंती करत राहील त्यामुळे संतांचे विचार आचरणात आणा व जिवाचा उद्धार आणि कल्याण करून घ्या असे ह.भ.प.लक्ष्मण महाराज हस्ते यांनी या वेळी आपल्या किर्तनातुन संदेश दिल

# बँकांपेक्षा खासगी सावकारांकडूनच शेतकऱ्यांना कर्ज, तब्बल ९७.८१ कोटी

अमरावती : जिल्ह्यात बँकांपेक्षा खासगी सावकारांनी शेतकऱ्यांना कर्ज दिले आहे. बेकायदेशीर सावकारीला बंदी घालणारा कायदा होऊनही शेतकरी सावकारांच्या तावडीतून सुटत नसल्याचे सहकार विभागाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. जिल्ह्यातील ६३५ परवानाधारक सावकारांनी ६९ हजार २५१ शेतकऱ्यांना (कर्जदार) ९७.८१ कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. आजही अनेक शेतकरी खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. या कर्जाचा व्याजदर जास्त असतो. पण बँकांमार्फत पीक कर्ज वाटपासाठीचे निकष आणि त्यासाठी होणार विलंब यामुळे शेतकरी गावातील किंवा ओळखीतल्या सावकाराकडून कर्ज घेताना दिसून येतात.तारण ठेवून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. जिल्ह्यातील ६८ हजार ८८४ शेतकऱ्यांनी ९५ कोटी २९ लाख ८३ हजार रुपयांचे तारण (गहाण) कर्ज घेतले आहे, तर ३६७ शेतकऱ्यांनी २ कोटी ५१ लाख १९ हजार रुपयांचे



बिगर तारण कर्ज घेतले आहे. संबंधित ६९ हजार शेतकऱ्यांनी हे कर्ज २५ एप्रिलपर्यंत संबंधित सावकारांना परत करायचे आहे. जिल्ह्यातील एकाही शेतकऱ्याला एकाही सावकाराने कृषी कर्ज दिले नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जिल्ह्यात सर्वाधिक २३७ सावकार अमरावती तालुक्यातील असून १४९ अचलपूरचे आहेत. शेतकऱ्यांना पीककर्ज मिळवण्यासाठी दरवर्षी बँकांच्या अनेक फेऱ्या माराव्या लागतात. त्याचबरोबर सावकारांकडे काही तारण ठेवून त्यांना सहज पैसे मिळतात, परंतु त्यांना बँकेपेक्षा सावकारांना जास्त व्याज द्यावे लागते. तरीही कर्ज सहज उपलब्ध होत असल्याने बहुतांश शेतकरी सावकारांच्या कर्जावर अवलंबून आहेत. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात एकूण परवानाधारक ६३५ सावकार आहेत. त्यापैकी बहुतेकांनी यंदा परवान्याचे नूतनीकरण केले आहे. जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पाठोपाठ रब्बी हंगामातही बँकांनी पीक कर्ज वाटपास टाळाटाळ चालविल्याचे चित्र आहे. रब्बीत ४२० कोटी रुपयांच्या तुलनेत आतापर्यंत केवळ ७३.२७ कोटी रुपयांचे कर्ज वितरण झाले आहे. कर्ज वाटपाचे प्रमाण १७ टक्क्यांवर स्थिर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अडचण कायम आहे.याआधी राज्यात मुंबई सावकारी नियंत्रण कायदा–१९४६ अस्तित्वात होता. पण, या कायद्याअंतर्गत सावकारानं बळकावलेली जमीन संबंधित शेतकऱ्याला परत करण्याचे अधिकार जिल्हा उपनिबंधकांना नव्हते. कालांतराने हा कायदा रद्द झाला. त्यानंतर २०१४ मध्ये महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम हा कायदा अस्तित्वात आला. राज्यात सद्यस्थितीत या कायद्याअंतर्गत सावकारी प्रकरणे हाताळली जातात.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com